International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# लिंगभाव आधारित पितृस्ताकता: “कोकणा आदिवासी महिलांचे व्यष्टी अध्ययन”

**डॉ. उमेश बाळासाहेब शिंदे**
*सहाय्यक प्राध्यापक (समाजशास्त्र व मानवशास्त्र विभाग)*
*के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक*
***Corresponding Author - डॉ. उमेश बाळासाहेब शिंदे***
**DOI - 10.5281/zenodo.10874456**

**गोषवारा:**

*आजच्या जगात दिसणारी स्त्रियांचे काम, पुरुषांचे काम अशी विभागणी 'नैसर्गिक' नाही. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत सहज घडलेली नाही, हे सांगण्यासाठी स्त्रीवादी अभ्यासकांनी लिंगभाव आणि श्रम या विषयावर सातत्याने मांडणी केली आहे. प्रस्तुत संशोधनात अशा काही पथ-प्रदर्शक अभ्यासांचा आढावा घेण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, कळवण या तालुक्यामध्ये आदिवासी जमातींची संख्या ही मोठ्या प्रमाणात आहे. त्यापैकी कोकणा आदिवासी जमात ही पुरुषसत्ताक पद्धती असल्यामुळे त्या कोकणा आदिवासी जमातीमधील स्त्रियांच्या परिस्थितीच्या लिंगभावात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधनांमध्ये लिंगभाव आधारित श्रमाचे राजकारण “कोकणा आदिवासी महिलांचे व्यष्टी अध्ययन” या विषयाची निवड करण्यात आली आहे. कोकणा आदिवासी जमातीचा मुख्य व्यवसाय हा शेती असून बहुतांश स्त्री-पुरुष शेती हा व्यवसाय करत असतात. या जमातीमधील स्त्रिया या घरकामा बरोबरच शेती व इतर व्यवसाय देखील करत असतात. म्हणून कोकणा आदिवासी जमाती मधील लिंगभाव आणि पुरुषसत्ताकता या दृष्टिकोनातून त्यांचे असणारे स्थान अथवा दर्जा याचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून या संशोधनात तो अभ्यास केला गेला आहे.*

**प्रस्तावना :**

आदिवासी समाज आर्थिक दृष्ट्या मागासलेला व डोंगराळ भागात वास्तव्य करणारा आहे. एकूण लोकसंख्येत आदिवासींचे प्रमाण विचारात घेता जगात भारताचा चौथा क्रमांक लागतो भारतात एकूण 427 आदिवासी जमाती आहेत. आदिवासींच्या चालीरीती त्यांची संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण असते. तर कोणी त्यांना धरतीची लेकरे म्हणून संबोधतात. याच लोकांच्या उल्लेख आदिवासी किंवा आदिम समाज म्हणून केला जातो. महाराष्ट्रात 47 अनुसूचित जमाती आहेत त्यापैकी नाशिक जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने इगतपुरी पेठ सुरगाणा त्रंबकेश्वर दिंडोरी कळवण सटाणा या तालुक्यांमध्ये डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात तर

जिल्ह्याच्या इतर तालुक्यात व इतर भागात कमी प्रमाणात दिसून येतात.

**आदिवासींची व्याख्या:**

गिलीन व गिलीन यांच्यामध्ये “एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज” असे म्हटले आहे. कोकणा आदिवासी जमातीमध्ये पितृसत्ताक कुटुंबपद्धती असल्यामुळे साहजिकच सर्व अधिकार व पुरुषांना देण्यात आले आहेत. या पितृसत्ताकतेमुळे लिंगभाव असमानता कोकणा आदिवासीमध्ये कशी दिसून येते. याचा अभ्यास या संशोधनातून करण्यात आला आहे. यामध्ये आपण लिंग आणि लिंगभाव या संकल्पनेचा आढावा घेणे गरजेचे आहे. लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम वापरणाऱ्या स्त्रिवाद्यातील एक ज्येष्ठ विचारवंत ॲनओकले या म्हणतात की लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरुषाची बालपणात व पुरुष पनात होणारी सामाजिक वर्गवारी सूचित होते. एखादी व्यक्ती स्त्रि की पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते. परंतु व्यक्तीचे बाई पण अथवा पुरुष पण मात्र स्थळ काळानुरूप बदलणाऱ्या सांस्कृतिक निकषांनी ठरत असते.

**लिंग (Sex) :**

एक नैसर्गिक असते लिंग एक जीवशास्त्री आहे ते स्त्रि- पुरुषांच्या फरकांमुळे दृश्य स्वरूपाचे आहे. लिंगभेदातील भेद हे प्रजनन प्रक्रिया प्रक्रियेतील कार्यांवर अवलंबून आहेत लिंग हे शक्यतो सहजपणे बदलता येत नाही लिंग हे सर्वत्र सारखे असते म्हणजेच ते स्थिर आहे.

**लिंगभाव (Gender) :**

लिंगभाव सांस्कृतिक असून मनुष्यनिर्मित आहे. लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक असतो. तो भूमिका गुण वर्तन प्रकार व जबाबदाऱ्या इत्यादींच्या स्त्रियोचीत आणि पुरुषोचित अशी विभागणी करतो. म्हणूनच प्रस्तुत संशोधनांमध्ये लिंगभाव आधारित श्रमाचे राजकारण “कोकणा आदिवासी महिलांचे व्यष्टी अध्ययन” या विषयाची निवड करण्यात आली आहे. या जमातीमधील स्त्रिया या घरकामा बरोबरच शेती व इतर व्यवसाय देखील करत असतात. म्हणून कोकणा आदिवासी जमाती मधील लिंगभावात्मक आणि पुरुषसत्ताकता या दृष्टिकोनातून त्यांचे असणारे स्थान अथवा दर्जा याचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून या संशोधनात तो अभ्यास केला गेला आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास** :

मारिया मीस यांच्या पुस्तकांनी स्त्रिया आणि काम या विषयात महत्त्वाची भर WC (1. "Patriarchy and Accumulation on a world scale : women in the International Division of Labour", M. Mies, 1986 and 2. "Women the Last Colony" . M. Mies, V. Bennholdt Thomses, C. Von Werlhof,

1988) त्या दाखवून देतात की पुरुषप्रधान व्यवस्था आणि भांडवलशाही अर्थव्यवस्था या परस्पराश्रयी व एकमेकांत मिसळलेल्या आहेत. त्यांचा गृहिणीकरणाचा (housewifization) चा सिद्धांत सांगतो की, जागतिक भांडवली अर्थव्यवस्थेचा पाया स्त्रीचे दुय्यम स्थान हाच असतो. लैंगिकतेवर आधारित स्त्रीचे शोषण करणारी श्रमविभागणी या व्यवस्थेत गृहित धरली जाते. १६ व्या शतकातील वसाहतीकरणाची प्रक्रिया मीस यांनी तपासली. त्यातून स्त्रियांचे परावलंबित्व वाढलेले दिसते. वासाहतिक देशातील व तिसऱ्या जगातील स्त्रियांना अत्यंत स्वस्त किंमतीत आपले श्रम विकावे लागतात तर पहिल्या जगातील स्त्रिया सक्तीने ग्राहक बनतात. पूर्ण अर्थव्यवस्था संघटित व असंघटित क्षेत्रात विभागली जाते. स्त्री कामगारांचा दर्जा मिळत नाही, त्यांची गणती गृहिणी म्हणूनच केली जाते. वासाहतिक समाजात नेहमीच निसर्ग, स्त्रिया आणि कष्टकरी वर्गाचे शोषण होत असते.

निसर्गाच्या शोषणाचा मुद्दा वंदना शिवा आपल्या अभ्यासात पुढे नेतात. (1 . "Staying Alive", V. Shiva, 2. “Ecofeminism", M. Mies & V. Shiva, 1993) त्यांच्या मते, निसर्गावरील अत्याचार हा वर्चस्ववादी विकासाच्या साच्यामध्येच आंतरिकरित्या जुळलेला आहे. ही विकासनीती पाश्चात्य आणि वसाहतवादी आहे. ह्या प्रश्नाचे उत्तर त्या निसर्गाला प्रकृती म्हणून पायाभूत मानणाऱ्या, निसर्गाचे कृतीशील आणि वैविध्यपूर्ण रुप ओळखणाऱ्या विकासनीतीत शोधतात. या विकासनीतीत स्त्रियांना महत्त्व राहते कारण तिसऱ्या जगातील स्त्रिया निसर्गावर अवलंबून आपली बहुसंख्य कामे करतात, निसर्गाचे त्यांना तपशीलात ज्ञान असते. (भागवत, रेगे, १९९४)

के. सारडामनी यांनी भातशेतीतील स्त्रियांचा अभ्यास केला आहे. ("Filling the Rice Bowl : Women in Paddy cultivation", K. Sardamoni, 1991) भातशेतीमध्ये स्त्रियांचा सहभाग खूप मोठा असतो. परंतु सरकारी किंवा स्वायत्त यंत्रणांकडून याकडे दुर्लक्ष केले जाते. कामाची देखरेख करणे, नेमणे, मजूरांबरोबर प्रत्यक्ष कामात सहभागी होणे आणि त्याचबरोबर घरातील जबाबदाऱ्या पार पाडणे हे वरच्या जातीवर्गातील स्त्रियांना करावे लागते. मात्र त्यांना सर्वसाधारणपणे फक्त चैन करणाऱ्या असे मानले जाते. स्त्रियांच्या मुलाखती आणि चरित्र चित्रणे यातून ही वस्तुस्थिती सारडामनी पुढे आणतात. या अभ्यासात केरळ, तामिळनाडू आणि प. बंगाल या प्रांतातील २८ खेड्यांचा समावेश आहे.

स्त्रियांची लैंगिकता, घर, घराभोवतीची चौकट, घरगुती कामे आणि रोजगार यांमधील महत्वाचे दुवे पाहण्याची निकड १९७५-८५ या दशकानंतर निर्माण झाली. या संदर्भात महत्त्वाचे अभ्यास नंतरच्या काळात झालेले दिसतात. यात लीला दुबे यांच्या संपादनाखाली निघालेली पाच खंडी पुस्तके (Women and Household in Asia Series, 1987-1992) , मारिया मीस यांचे पुरूषप्रधानता व जागतिक पातळीवरील धनसंचय १९८६ आणि स्त्रिया नावाची शेवटची वसाहत १९९०, बीना अगरवाल यांचे स्त्रिया दारिद्रय आणि

भारतातील शेतीचा विकास १९८६, छाया दातार यांचे बदल आणताना १९९१, निर्मला बॅनर्जी यांचे पुरूषप्रधानता व स्त्रियांचे काम १९९२, के. सारडामनी यांचे भाताचा वाडगा भरताना : भातशेतीतील स्त्रिया १९९१ अशा अभ्यासांचा समावेश होतो, (भारतीय स्त्रियांचे काम: गुंतागुंतीचा परंतु कळीचा प्रश्न, विद्युत भागवत व शर्मिला रेगे, वार्षिक स्त्री उवाच, १९९४)

**अध्यनाचा उद्देश** :

1) कोकणा आदिवासी महिलांमधील लिंगभाव आधारित पितृस्ताकता तपासणे.
2) लिंगभाव आधारित पितृस्ताकतेमुळे होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे .

**गृहितकृत्य** :

1) लिंगभाव आधारित पितृस्ताकतेमुळे कोकणा आदिवासी महिलांना दुयमत्व प्राप्त होते .

**अध्ययन पद्धती** :

संशोधनामध्ये वेगवेगळ्या घटकांच्या अभ्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करावा लागतो. माहिती संकलनाच्या पद्धतीचा वापर करून लिंगभाव आधारित पितृस्ताकता: "कोकणा आदिवासी महिलांचे व्यष्टी अध्ययन"या विषयाच्या शास्त्रीय अभ्यास साठी खालील संशोधन पद्धती अवलंबण्यात आली. यामध्ये नमुना निवड नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील माणिपाडा गावातील 30 नमुने यासाठी निवडण्यात आले. या संशोधन विषयासाठी खालील दोन स्त्रोतांद्वारे तर ते संकलित करण्यात आली. एक प्राथमिक स्त्रोत संशोधन विषयाची तथ्य प्रामुख्याने या स्त्रोतावर अवलंबून आहेत. यामध्ये निरीक्षण ही संशोधना संबंधी अद्यावत माहिती मिळवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे साधन मानले जाते. उदाहरणार्थ स्त्री आणि पुरुष यांच्या श्रमविभाजनाची वाटणी, स्त्री आणि पुरुष किंवा कुटुंबातील स्त्रियांना दिली जाणारी वागणूक, त्यांच्या कामाचे स्वरूप, त्यांचे कुटुंबातील असणारे स्थान इत्यादी बाबींचा संशोधनामध्ये अभ्यास केला जाणार आहे. अनुसूचित द्वारे मुलाखती सामाजिक संशोधनांमध्ये अनुसूची मुलाखत अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या संशोधनासाठी कोकणा कुटुंबातील महिला यांच्या अनुसूची प्रश्नांच्या आधारावर त्या महिलांच्या मुलाखती घेण्यात आल्या. प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करून काही निष्कर्ष काढण्यात आले. द्वितीय स्त्रोतात कोकणा जमातीतील महिलांची माहिती घेण्यासाठी वेगवेगळ्या स्त्रोतांचा आधार घेण्यात आला. यामध्ये शोधनिबंध, विविध संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे नियतकालिके, साप्ताहिके अहवाल व इतर स्त्रीवाद्यांनी केलेले संशोधन इत्यादीच्या आधारे संदर्भ साहित्याचा द्वितीय स्रोत म्हणून वापर करण्यात आला. आणि त्यातून आवश्यक असणारी माहिती घेण्यात आलेली आहे.

**तथ्यांचे विश्लेषण** :

कोकणात आदिवासी महिलांसाठी जी मुलाखत अनुसूची बनवण्यात आली होती. त्या मुलाखत अनुसूची चे विश्लेषण केलेले आहे. ही अनुसूची 30 कोकणा महिलांसाठी वापरण्यात आली. त्या प्रश्नावलीच्या विश्लेषणाच्या अनेक पैलू पैकी एक असे स्पष्ट होते की पितृसत्ताकतेचा कोकणा आदिवासी जमातीवर मोठा प्रभाव पडलेला आहे. यामुळे त्यांचे शिक्षण राहणीमान कौटुंबिक दर्जा, स्रि- पुरुष असमानता व त्यांची श्रमविभागणी यावरती परिणाम झालेला दिसून येतो. त्यांच्या घरकामाला(श्रमाला) महत्व दिले जात नाही.

थोडक्यात पितृसत्ता ही पुरुषीपणाच्या आणि स्रीत्वाच्या काही संकेतावर उभी आहे लैंगिकता आणि संपत्ती यामध्ये पुरूषांचे विशेषाधिकार, पुरुषांच्या निवडी आणि आवडी यांचे वर्चस्व पितृसत्ता निर्माण करते.

**निष्कर्ष:**

1. पितृसत्ताकतेमुळे कोकणा आदिवासी महिलांचे स्थान हे लिंगभावात्मक दृष्टिकोनातून दुय्यम असल्याचे दिसून आले.
2. कोकणा आदिवासी महिलांना लिंगभावात्मक दृष्टिकोनातून असणाऱ्या दुय्यमत्वामुळे त्यांना पुरुषांवर राजकीय आर्थिक दृष्टीने अवलंबून राहावे लागते.

**संदर्भ सूची :**


1. भागवत विद्युत, १९९४, रेगे शर्मिला "भारतीय स्त्रियांचे कामगुंतागुंतीचा परंतु : कळीचा प्रश्न" वार्षिक स्त्री उवाच,.
2. विद्युत भागवत, शर्मिला रेगे, वंदना पलसाने, १९९४, "स्त्री जीवनाची गुंतागुंत" विकास अध्ययन केंद्र, मुंबई,
3. भागवत विद्युत : "स्त्रियांचे बदलते काम, घरातील व घराबाहेर" : पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या संदर्भात Report submitted to ICSSR (1994-1996).
4. प्राशरित भौमिक यांची मुलाखत . "एकेकाळच्या संघटित सुरक्षित कामगार शहरी गरीब बनत आहे". मुलाखतकार - महेश गावस्कर, पर्याय, एप्रिलजून-, १९९९.
5. ब्रह्मे सुलभा, १९९९, "जागतिकीकरणाच्या वेढ्यात भारतीय स्त्री"
6. हायडी हार्टमन, अनुवाद विद्युत भागवत, १९९६, मार्क्सवादी आणि स्त्रीवादी चळवळ यांचा बिघडलेला संसार अधिक : पुरोगामी मिलाफाच्या दिशेने केलेला एक स्त्री अभ्यास केंद्र .शोध, पुणे विद्यापीठ, पुणे,
7. प्रीती करमरकर, अनुवाद प्रवीण चव्हाण :, १९९९, "स्त्रीवादी सिद्धांकन आणि

ज्ञाननिर्मिती", स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे,.
8. पोरे कुमूद, १९९४,"घरकामाला वेतन"? वार्षिक स्त्री उवाच,.
9. नंदिता शहा, सुजाता गोठोस्कर, नंदिता गांधी, १९९४, "रचनात्मक सुधारणा, स्त्रीकरण आणि डावपेच" अनुवादरंजना-, वार्षिक स्त्री उवाच,
10. भसीन कमला भाषांतर तांबे श्रुती, ”लिंगभाव समजून घेताना“, लोकवाङ्मय गृह.
11. संपावैद्य . शांता, कुलकर्णी सुधा, १९९२, मुंबई. श्रमशक्ती : “स्वयंरोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील स्त्रिया यांच्यासंबधी राष्ट्रीय आयोग अहवाल".
12. Agarwal Bina, July 1986. "Poverty and Agricultural Growth in India". Journal of Peasant Studies Vol. 13, No. 4,
13. Agarwal Bina 1988, "Structures of Patriarchy : State, Community and Household in Modernising Asia", Kali for women, New Delhi,
14. Agarwal Bina, July 1988, "Who saws who Reaps?" The Journal of Peasant Studies Vol. 15 No. 4
15. Banerjee Nirmala, 1985, "Women Workers in Unorganised Sector" Sangam Book, Hyderabad Pvt. Ltd.
16. Boserup Ester 1970, 1989, "Woman's Role In Economic Development "Earthscan Publications Ltd., London,
17. Choudhary Prem, 1994, "The Veiled Woman : Shifting Gender Equations in Rural Haryana, 1880-1990", Oxford University Press, New Delhi.
18. Datar Chhaya, 1999, "Waging Change" Kali for Women, New Delhi,
19. Dietrich G., 1992, "Reflections on the women's Movement in India : Religion, Ecology and Development", Horizon, New Delhi,
20. Dube L. & Palriwala R. (eds.), 1990, "Structures and Strategies : Women, Work and Family", Sage, New Delhi.